**DEPARTMENT OF STUDENTS' WELFARE &**

**NATIONAL SERVICE SCHEME CELL**

**S.N.D.T. Women's University, Mumbai**

1st Floor, Above Patkar Hall, Nathibai Thackersey Road, Mumbai-400 020

Telephone: 22031879 Ext. 260 · Telefax: 22072209 · Direct: 22018893

Fax: 9122-22018226 SNDT Email: dswsndt@yahoo.co.in

---

Ref.No.DSW-NSS/2013-14/58 November 14, 2013

To,
The Principal,
All the Colleges Conducted by & Affiliated to
SNDT Women's University,
Having NSS Unit.

Dear Sir/Madam,

All the NSS Units are hereby informed that this year **Utkarsh-Social & Cultural Competition** is organized from 14th to 16th December 2013 at **Bharati Vidyapeeth University, Pune.**

You are requested to read enclosure for more details & convey your NSS Volunteers' participation by 30th November to NSS Cell, SNDT Women's University, Mumbai. You are requested to send data of participants volunteers to your Zonal Coordinator.

Thanking you,

Yours Sincerely,

Sd/-
(Mr. Vinod Zalte)
NSS Coordinator

Encl: - SLO Office letter

महाराष्ट्र शासन

क्रमांक : रासेयो-२०१३/(७३/१३)/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष
एलफिस्टन तंत्र विद्यालय परिसर
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव
मुंबई -४०० ००१.
**दिनांक :- ३१ ऑक्टोबर, २०१३.**

प्रति,

मा.कार्यक्रम समन्वयक,
सर्व कृषि / अकृषि / संस्कृत / मुक्त / आरोग्य विद्यापीठे,
+२ स्तर / व्यवसाय / तंत्रशिक्षण / संस्था

**विषय : सन २०१३-१४ मधील उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा आयोजनाबाबत.**

मा.महोदय / महोदया,

सन २०१३-१४ या वर्षाच्या **उत्कर्ष** सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे येथे दि. १४ते १६ डिसेंबर, २०१३ या कालावधीत संपन्न होणार आहेत.

उत्कर्ष स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी तसेच प्रवेशिकेसाठी उत्कर्ष नियमावलीची पुस्तिका सोबत जोडीत आहे.

दि. १३ डिसेंबर, २०१३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे येथे पोहचावे. तसेच १६ डिसेंबर, २०१३ रोजी संध्याकाळी ६.०० वा.नंतर प्रस्थान करण्यात येईल.

उत्कर्ष स्पर्धेचा संघ १९ जणांचा असेल. (९ मुले + ९ मुली + १ कार्यक्रम अधिकारी - संघनायक) संघनायकाबरोबर गतवर्षीचे फिरते चषक सुयोग्य अवस्थेत पाठविणे बंधनकारक आहे.

उत्कर्ष नियमावलीनुसार संघाच्या परिपूर्ततेची पूर्तता करण्याची जबाबदारी कार्यक्रम समन्वयकांची राहील.

उत्कर्ष स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट रासेयो कार्य प्रसिध्दी अहवाल पुरस्कार तसेच उत्कृष्ट रासेयो विद्यापीठ भितिचित्र स्पर्धेचे पुरस्कार देण्यात येतील.

उत्कर्ष स्पर्धेच्या निमित्ताने खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत :-

**अ) पथसंचलन - १) ऊर्जा बचत २) पर्यावरण दक्षता.**

**ब) वकृत्व स्पर्धा - महिलांना स्वयं संरक्षणाचे प्रशिक्षण देणे- काळाची गरज.**

**क) निबंध स्पर्धा - १) व्यसनमुक्ती - युवा पिढीसमोरील आव्हान ! २) रस्ता सुरक्षा अभियान - युवकांचा सहभाग**

संपर्क : प्रा. के.व्ही.मोहिते, कार्यक्रम समन्वयक, भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे
भ्रमणध्वनी : ९८५०४०९३०१/७३८५१७३९८७ कार्यालय दूरध्वनी : ०२०-२५४३३३८३/ २५४२४१६३
फॅक्स : ०२०-२५४४०२०१ /२४३३९१२१

( डॉ. अतुल साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी

प्रत :

कार्यक्रम समन्वयक, भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे .
सह सचिव (साशि-७), मंत्रालय विस्तार, मुंबई

D:\SSD-NSS\Utkarsha-2010-SLO.doc

**राष्ट्रीय सेवा योजना कक्ष**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व**
**राष्ट्रीय सेवा योजना, भारती विद्यापीठ विश्वविद्यालय,पुणे आयोजित**
**'उत्कर्ष' - राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा**

**नियमावली :-**

१. प्रत्येक विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत उत्कृष्ट स्वयंसेवकांची निवड चाचणी द्वारे संघ तयार करतील.
२. संघ संख्या १९ असेल, त्यात ९ स्वयंसेवक व ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रम अधिकारी यांचा समावेश असेल.
३. सहभागी संघास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहित असावीत.
४. संघातील प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धेदरम्यान २५ वर्षे पूर्ण नसावे.
५. संघ पात्रतेची पूर्ण जबाबदारी संबंधित कार्यक्रम समन्वयक यांच्यावर राहील.
६. सहभागी संघ आरोग्यदृष्टया सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असावे.
७. सहभागी संघातील प्रत्येक स्पर्धकास पालक व तसेच प्राचार्यांच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.
८. परीक्षकांनी दिलेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.
९. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश मूल्य आकारले जाणार नाही.
१०. सहभागी स्पर्धकांचा प्रवासखर्च विद्यापीठाने / महाविद्यालयाने प्रशासकीय खर्चातून करावा.
११. प्रत्येक स्पर्धकांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत असावे.
१२. राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होण्या-या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊ नये.
१३. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी असेल.

**उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा सहा विभागात घेतली जाईल.**

**१) नृत्य : ( DANCE)**

**संकल्पना नृत्य : (CREATIVE DANCE)**

१. यामध्ये एका कलाकाराचा सहभाग असेल व कलाकृती सादर करताना ३ साथीदार सोबत असतील.
२. सहभागी कलाकार नृत्यातून आविष्कार सादर करेल. इतर साथीदार संगीत, संवाद व गाणे या माध्यमातून त्याला साथ देतील.
३. नृत्याचा कालावधी जास्तीत जास्त ७ मिनिटे असेल व ५ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविली जाईल.(सादरीकरणाची किमान वेळ ५ मिनिटे असेल.)
४. संकल्पना नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारित विषयाचा संदेश प्राप्त होणे अपेक्षित आहे.

## २) नाटय : (THEATRE)

**पथनाटय :**

१. नाटयप्रकार पथनाटय सादर केले जाईल.

२. पथनाटयामध्ये ४ ते ९ स्पर्धक भाग घेतील व त्यात साथीदार समाविष्ट असतील.

३. पथनाटयाचा कालावधी १० मिनीटे असेल व ८ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविण्यात येईल.

४. पथनाटयामध्ये संहिता स्वयंसेवकांनी लिहिलेली असल्यास त्यास विशेष प्राधान्य दिले जाईल.

५. पथनाटयामध्ये लेखी संहिता, संगीत, संवाद, दिग्दर्शकाचे नावे स्पर्धेपूर्वी आयोजक विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील.

६. या प्रकारात ध्वनी क्षेपकांचा वापर अपेक्षित नाही.

## ३ ) संगीत : (MUSIC)

**(अ) (समूहगीत)**

१. संगीत विभागात समूहगीत सादर केले जाईल.

२. या स्पर्धेत ६ कलाकार सहभाग घेतील व ३ साथीदार साथ देतील.

३. समूहगीत सादरीकरणाचा कालावधी १० मिनीटे असेल व त्यात सलग २ गीत सादर करणे अपेक्षित आहे.

४. त्यात १ लोकगीत (Folk song) व दुसरे देशभक्तीपर (Patriotic) गीत असेल.

५. चित्रपटात सादर झालेले गीत स्पर्धेकरिता निवडू नये.

६. समूहगीत मराठी किंवा हिंदी भाषेत सादर करावे.

**(ब) भारतीय लोक वाद्य :**

१. स्पर्धेत एका विद्यापीठाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.

२. रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ.पूर्व तयारीसाठी २ मिनिटे दिली जातील.

३. संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असावी.

४. सिनेगीतांना या कला प्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

५. सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.

६. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील व ८ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

## ४) ललितकला (FINE ART)

**भित्तीचित्र (POSTER COMPETITION) घोषवाक्यासह (SLOGAN)**

१. सदर स्पर्धेत २ स्पर्धक (१ मुलगा १ मुलगी) सहभाग घेतील. म्हणजेच प्रत्येक विद्यापीठाच्या २ प्रवेशिका असतील.

२. स्पर्धेचा कालावधी अडीच तास असेल.

३. स्पर्धेस लागणारा कागद आयोजक विद्यापीठ उपलब्ध करेल. परंतु इतर साहित्य (उदा.रंग, ब्रश इ.) स्पर्धक व संबंधित विद्यापीठाने आणावयाचे आहे.

४. स्पर्धेचा विषय स्पर्धा सुरु करताना दिला जाईल.

५. भित्तीचित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नांव, विषय व विद्यापीठाचा कोड क्रमांक नमूद करावा.
६. भित्तीचित्रात समर्पक घोषवाक्याचा समावेश असावा.

## ५) साहित्य : (LITERATURE)

### (अ) निबंध

१. निबंध स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. स्पर्धेचा कालावधी २ तास असेल.
३. निबंधाचे २ विषय संघप्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी दिले जातील.
४. प्रत्येक संघाने २ स्पर्धकाची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी निबंध लिहावयाचा आहे.
५. निबंधाचे माध्यम मराठी,इंग्रजी व हिंदी असेल.

### ब) वकृत्व स्पर्धा :

१. वकृत्व स्पर्धेत १ स्पर्धक ( मुलगा किंवा मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३मिनिटानंतर सूचकघंटा होईल.
३. स्पर्धेचे विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी जाहीर केला जाईल.
४. स्पर्धेदरम्यान जाहीर केलेल्या विषयावरील ठळक मुद्दे लेखी स्वरुपात पंचांना सादर करणे बंधनकारक राहील.

### क) कविता:

१. स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. प्रत्येक संघाने २ स्पर्धकाची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी कविता सादर आहे.
३. निबंधाचे माध्यम मराठी व हिंदी असेल.
४. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३मिनिटानंतर सूचकघंटा होईल.
५. कवितेमध्ये नविन आशयाचा संदेश असावा.

## ६) छायाचित्रण स्पर्धा (Photography)

१. प्रत्येक सहभागी संघाने स्पर्धेच्या उद्घाटनापासून ते स्पर्धा संपेपर्यंतच्या कालावधीतील छायाचित्रे काढावीत.
२. त्यातून उत्कृष्ट १५ छायाचित्रे लघुमुद्रिका (सी.डी.) स्वरुपात सादर करावयाची आहे.
३. स्पर्धेसाठी लागणारा डिजीटल कॅमेरा सहभागी विद्यापीठाने आणावयाचा आहे.
४. संगणक व संबंधित सामुग्रीची व्यवस्था आयोजन विद्यापीठ करेल.

## ७) पथसंचलन :

पथसंचलन हे उद्घाटन सोहळयापूर्वी संपन्न होणे अपेक्षित आहे. उत्कर्ष हि स्पर्धा सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा असल्यामुळे सामाजिक समस्येवर आधारित रासेयो उपक्रमातील संबधित संकल्पना देण्यात येईल. दिलेल्या विषयावर विविध प्रकारे वेशभुषा, रंगसंगती, चलचित्र, घोषवाक्य इ. माध्यमांचा वापर व्हावा. या

पथसंचलन सुरुवातीला विद्यापिठाचा बॅनर असावा व त्या पाठोपाठ पथसंचलनाचा चमू असावा. विद्यापीठ अंतर्गत सहभागी सर्व स्पर्धक पथ संचलनात भाग घेणे अपेक्षितआहे. पथ संचलनाच्या गुणांचा सर्वसाधारण विजेते पद घोषित करताना विचार केला जाणार नाही. नाविन्यपूर्ण, उत्कृष्ट पथ संचलन चमूस फिरता चषक देण्यात येईल.

**८) कार्य प्रसिध्दी अहवाल :-**

२४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या सप्ताहामध्ये विद्यापीठाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांवर आधारित अहवाल तयार करणे अपेक्षित असून, तो अहवाल या स्पर्धेसाठी अपेक्षित आहे आणि या अहवालावर परिक्षकांमार्फत गुण तक्ता तयार करुन सर्वोत्कृष्ट कार्य प्रसिध्दी अहवालास पुरस्कार दिला जातो. या गुणांचा सर्वसाधारण विजेत्या पदासाठी विचार केला जाणार नाही.

**९) उत्कर्ष कार्य प्रसिध्दी स्पर्धा - (फ्लेक्स् बॅनर)**

१. या स्पर्धेत सहभागी विद्यापीठांनी १ x १ मीटर या आकाराच्या फ्लेक्स् भित्तीचित्र बनविणे अपेक्षित आहे.
२. या स्पर्धेसाठी प्रत्येक विद्यापीठांनी २ फ्लेक्स् आणणे अपेक्षित आहे.

**प्रमाणपत्रे व पारितोषिके :**

१. प्रत्येक विभागातील स्पर्धेस अनुसरुन प्रथम ३ उत्कृष्ट विजेत्यांना पारितोषिके दिले जातील.
२. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
३. स्पर्धेच्या प्रत्येक विभागात फिरता चषक, तसेच सर्वोत्कृष्ट संघास फिरता चषक देण्यात येईल.

**संपर्क आणि स्पर्धा स्थळ :**

**स्थळ :** राष्ट्रीय सेवा योजना विभाग, भारतीय विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय,पुणे.

**संपर्क : प्रा.के.व्हि.मोहिते - ०२०-२५४ ३३३८३/२५४२४१६३**

**भ्रमणध्वनी क्रमांक : ९८५०४०९३०१/७३८५१७३९८७**

कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, भारतीय विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय,पुणे.

**स्पर्धा दिनांक :** दिनांक : १४ डिसेंबर, २०१३

**आगमन :** दिनांक १४ डिसेंबर,२०१३ १३ /१४ डिसेंबर, २०१३ दुपारी

**प्रस्थान :** दिनांक १६ डिसेंबर, २०१३ संध्याकाळी ६. ०० वाजता.

* उत्कर्ष प्रवेशिका *

विद्यापीठाचे नांव : ..........................................

पत्ता : ..........................................

दूरध्वनी क्रमांक : .................. फॅक्स : ..................

संघप्रमुखाचे नांव : ..........................................

भ्रमणध्वनी : ..........................................

| अ.क्र | स्पर्धकांची नांवे | वर्ग | महाविद्यालयाचे नांवे | जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| मुले | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| मुली | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
विद्यापीठ .........
...............

**विद्यापीठाचे नांव :**

**प्रवेशिका**

(उत्कर्ष - प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख : २८ नोव्हेंबर, २०१३- सर्व सहभागी स्पर्धकाचे फोटो अपेक्षित.

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धा प्रकार | सहभागी संख्या | साथीदार संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | नृत्य | संकल्पना नृत्य | | |
| २. | नाटय | पथनाटय<br>एकपात्री अभिनय | | |
| ३. | संगीत | समूहगीत<br>भारतीय ताल व सूर वाद्य | | |
| ४. | ललितकला | भित्तीचित्र व घोषवाक्य | | |
| ५. | साहित्य | अ) निबंध<br>ब) वादविवाद | | |
| ६. | छायाचित्रण | छायाचित्रण | | |

(टीप : प्रत्येक विद्यापीठाच्या संघाची एकूण स्पर्धकांची संख्या १९ असेल व साथीदार त्यात समाविष्ट असतील)

प्रतिज्ञापत्र

मी खाली सही करणार श्री / श्रीमती / कु. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . असे नमूद करतो / करते की, मी विद्यापीठाच्या . . . . . . . . . . . . . . . . . . स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल केली आहे. उपरोक्त प्रवेशिकेमध्ये नमूद केलेली सर्व माहिती सत्य आणि वास्तव आहे. अशी मी हमी देत आहे. यामध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास सदर स्पर्धेसाठी संघ अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच पुढे मी असेही नमूद करतो / करते की, उपरोक्त स्पर्धेच्या सर्व नियम व अटी मी वाचलेल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. शिवाय राज्य संपर्क अधिकारी / आयोजन समितीने दिलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, याची देखील मला पूर्ण जाणीव आहे.

सदर स्पर्धेत सहभागी होणारे सर्व १९ स्वयंसेवक हे २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय / विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना एककातील नोंदणीकृत स्वयंसेवक आहेत. सोबत प्रत्येकाचे स्वयंसेवक नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे.

नांव व सही . . . . . . . . . . . . . . . . . दिनांक :

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

**प्रतिज्ञापत्र**

मी खाली सही करणार श्री / श्रीमती / कु. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . असे नमूद करतो / करते की, मी विद्यापीठाच्या . . . . . . . . . . . . . . . . . स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल केली आहे. उपरोक्त प्रवेशिकेमध्ये नमूद केलेली सर्व माहिती सत्य आणि वास्तव आहे. अशी मी हमी देत आहे. यामध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास सदर स्पर्धेसाठी संघ अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच पुढे मी असेही नमूद करतो / करते की, उपरोक्त स्पर्धेच्या सर्व नियम व अटी मी वाचलेल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. शिवाय राज्य संपर्क अधिकारी / आयोजन समितीने दिलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, याची देखील मला पूर्ण जाणीव आहे.

सदर स्पर्धेत सहभागी होणारे सर्व १९ स्वयंसेवक हे २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय / विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना एककातील नोंदणीकृत स्वयंसेवक आहेत. सोबत प्रत्येकाचे स्वयंसेवक नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे.

नांव व सही . . . . . . . . . . . . . . . . . दिनांक :

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना